# मा.संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय तथा सक्षम प्राधिकारी यांचे समोर

( क्र.०५/ व्हिओसी/सुनावणी/२०२६/235)

**महाराष्ट्र राज्यात कृषी, पशु व मत्स्य विज्ञान, उच्च, तंत्र व व्यवसाय शिक्षण यांमधील अनधिकृत संस्था स्थापन करणे आणि अनधिकृत अभ्यास पाठ्यक्रम सुरु करणे (प्रतिबंध) अधिनियम २०१३ अन्वये अर्ज.**

**सहसंचालक**
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण,
प्रादेशिक कार्यालय,घोलेरोड पुणे ... अर्जदार

**विरुध्द**

**कार्यकारी संचालक**
श्री. भास्कराचार्य प्रतिष्ठाण, छ. संभाजीनगर ... प्रतिवादी
श्री. हनुमान चाटे ज्यु. कॉलेज संभाजीनगर,
कोल्हापुर जि. कोल्हापुर

## प्रस्तावना

महाराष्ट्र राज्यात कृषी, पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च, तंत्र व व्यवसाय शिक्षण यांमधील अनधिकृत संस्था स्थापन करणे व अनधिकृत अभ्यासक्रम सुरू करणे (प्रतिबंध) अधिनियम, २०१३ चे कलम ५ व "महाराष्ट्र कृषी, पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च, तंत्र व व्यवसाय शिक्षण यांमधील अनधिकृत संस्था व अनधिकृत अभ्यासक्रम (तक्रारी, अपील व सुधारात्मक उपाययोजना) नियम, २०२४" निर्गमित केले आहेत.

## पूर्वपीठिका

श्री.भास्कराचार्य प्रतिष्ठाण, छत्रपती संचालित श्री हनुमंतराव चाटे ज्यु. कॉलेज संभाजीनगर, कोल्हापुर जि. कोल्हापुर.या संस्थेने कॉम्पुटर सायन्स या अभ्यासक्रमाच्या एका तुकडीस मान्यता नसताना सदर शैक्षणिक सत्र २०२३-२४ मध्ये इयत्ता ११ वी साठी कॉम्पुटर सायन्स-५३, अनुक्रमे २०२४-२५ मध्ये ७१ व २०२५-२६ मध्ये ६८ विद्यार्थ्यांना अनधिकृत प्रवेश केले आहेत. सबब संस्थेने शासनाची मान्यता नसताना कॉम्पुटर सायन्स या अभ्यासक्रमात अतिरिक्त प्रवेश देऊन महाराष्ट्र राज्यात कृषी, पशु व मत्स्य विज्ञान, उच्च, तंत्र व व्यवसाय शिक्षण यांमधील अनधिकृत संस्था स्थापन करणे आणि अनधिकृत अभ्यास पाठ्यक्रम सुरु करणे (प्रतिबंध) अधिनियम २०१३ या अधिनियमाचे उल्लंघन केले आहे .

२.त्याअनुषंगाने संचालनालयाच्या दिनांक २७/०१/२०२५ च्या आदेशान्वये स्थापित सत्यशोधन समितीने श्री हनुमंतराव चाटे ज्यु. कॉलेज शाहुपूरी, कोल्हापुर जि. कोल्हापुर या संस्थेच्या प्राप्त तक्रारीबाबत प्राथमिक चौकशी करुन अहवाल संचालनालयास सादर करणेबाबत व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण,प्रादेशिक कार्यालय, पुणे यांना कळविण्यांत आले होते. त्यानुसार व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण,प्रादेशिक कार्यालय, पुणे यांच्या दिनांक २३/०५/२०२५ व १०/०३/२०२६ रोजीच्या पत्रान्वये सदर बाबतचा अहवाल अभिप्रायसह संचालनालयास सादर केला आहे.

## सुनावणी

सदर अर्जाच्या अनुषंगाने अधिनियमातील तरतुदीनुसार संचालनालयाचे पत्र क्र. ०५/व्हिओसी/सुनावणी/२०२६/१९६ दि.१६/०६/२०२६ नुसार दिनांक **२३/०६/२०२६ रोजी दुपारी १.०० वाजता** सुनावणी घेण्यात आली.

३.सुनावणीस खालील अधिकारी/प्रतिनिधी उपस्थित होते :

- श्री. नि.आ.निकम,उपसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, संचालनालय, मुंबई
- श्रीमती सोनम चौधरी, सहायक संचालक (तां.), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, संचालनालय, मुंबई
- श्री. एस. आर. भालचिम,निरीक्षक प्रादेशिक कार्यालय, पुणे
- श्री.वाय.बी. पाटिल, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, कोल्हापुर
- श्री. विजय मंडलिक, प्राचार्य, श्री हनुमंतराव चाटे ज्यु. कॉलेज संभाजीनगर, कोल्हापुर जि. कोल्हापुर.

अर्जदार व प्रतिवादी यांनी दिनांक २३/०६/२०२६ रोजी झालेल्या सुनावणीदरम्यान तोंडी युक्तिवाद सादर केला.त्यानुसार सदर प्रकरण आदेशासाठी राखून ठेवण्यात आले (Case Closed for Order).

## अर्जदार व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण,प्रादेशिक कार्यालय, पुणे यांचा युक्तिवाद

४. अर्जदारांनी नमूद केले की :

- श्री हनुमंतराव चाटे ज्यु. कॉलेज संभाजीनगर, कोल्हापुर जि. कोल्हापुर. या संस्थेने शैक्षणिक वर्ष २०२३-२४, २०२४-२५ व २०२५-२६ मध्ये प्रवेशित विद्यार्थ्याच्या याद्या जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, कोल्हापूर कार्यालयात प्रमाणीत करण्याकरीता सादर केल्या असता त्यामध्ये गंभीर स्वरुपाच्या बाबी निदर्शनास आलेल्या आहेत. कॉम्प्यूटर सायन्स या अभ्यासक्रमास मंजूर प्रवेश क्षमता प्रत्येकी ५० विद्यार्थी असताना इयत्ता ११ वी मध्ये अनुक्रमे (५०+३), (५०+२१) विद्यार्थ्यांना जादा प्रवेश दिलेचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे शैक्षणिक वर्ष २०२३-२४, २०२४-२५ मध्ये प्रवेश क्षमतेपेक्षा ३ व २१ विद्यार्थ्यांचे प्रवेश हे नियमवाहय व अनाधिकृतपणे जादाचे दिलेले आहेत.
- उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र. व्हीओसी-२००९/१५/०९/व्यशि-४ दि.१०/०७/२००९ व कौशल्य विकास व उद्योजकता विभाग,शासन निर्णय क्र.व्हीओसी-२०१६/प्र.क्र.१९६/व्यशि-४ दि.०९/०२/२०१७ नुसार ज्या अटी व शर्तीच्या अधिन राहून अभ्यासक्रम सुरु करण्यांस शासनाने मान्यता दिलेली आहे त्या अटी व शतीचे अवलोकन संस्थेने गांर्भीयाने केल्याचे दिसून येत नाही. शासन निर्णयामध्ये प्रती तुकडी प्रवेश क्षमता ५० विद्यार्थी असा उल्लेख असतानाही संस्थेने सोइस्करपणे डोळेझाक करुन नियमबाह्य व अनाधिकृत जादाचे प्रवेश दिलेले आहेत.
- श्री हनुमंतराव चाटे ज्यु. कॉलेज संभाजीनगर, कोल्हापुर जि. कोल्हापुर या संस्थेने महाराष्ट्र राज्यात कृषी, पशु व मत्स्य विज्ञान, उच्च, तंत्र व व्यवसाय शिक्षण यांमधील अनधिकृत संस्था स्थापन करणे आणि अनधिकृत अभ्यास पाठ्यक्रम सुरु करणे (प्रतिबंध) अधिनियम २०१३ अधिनियमाचा भंग केलेला असल्याने सदर अधिनियमातील तरतुदीनुसार, सदर प्रकरणी पुढील कार्यवाहीकरिता सदर प्रकरण व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, पुणे यांनी त्यांच्या दिनांक १०/०३/२०२६ च्या पत्रान्वये मा.संचालक तथा सक्षम प्राधिकरण यांचेकडे सादर करण्यात आले.

श्री हनुमंतराव चाटे ज्यु. कॉलेज संभाजीनगर, कोल्हापुर जि. कोल्हापुर, या संस्थेने कॉम्पुटर सायन्स या अभ्यासक्रमास शासनाची कायम स्वरूपी मान्यता नसताना सत्र २०२३-२४, २०२४-२५ मध्ये इयत्ता ११ वी साठी अनुक्रमे कॉम्पुटर सायन्स-३ व २१ विद्यार्थ्यांना अनधिकृत प्रवेश केले आहेत.

## प्रतिवादी यांचा युक्तिवाद

५. प्रतिवादी संस्थेच्या प्रशासकीय प्रमुखांनी नमूद केले की -
शैक्षणिक सत्र २०२३-२४, २०२४-२५ व २०२५-२६ मध्ये इयत्ता ११ वी साठी अनुक्रमे कॉम्पुटर सायन्स-३ व २१ या अभ्यासक्रमास शासनाची कायम स्वरूपी मान्यता नसताना अनधिकृत प्रवेश दिले असल्याचे सांगितले. सदर चूक मान्य असून भविष्यात अशा प्रकारचे अनधिकृत प्रवेश केले जाणार नाहीत अशी हमी देऊन संस्थेच्या प्राचार्यांनी संस्थेवर कमीत कमी शास्ती लादण्यात यावी, अशी विनंती केली.

## निष्कर्ष

सहसंचालक अर्जदार यांचा अहवाल, सत्यशोधन समिती अहवाल, संस्थेचा तोंडी युक्तिवाद, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी कोल्हापुर अहवाल यांचा विचार करून निष्कर्ष खालील प्रमाणे :

१. वरील वस्तूस्थितीचा विचार करता सदर शैक्षणिक सत्र २०२३-२४, २०२४-२५ मध्ये इयत्ता ११ वी साठी अनुक्रमे कॉम्पुटर सायन्स ३ व २१ या अभ्यासक्रमास प्रवेश शासनाची कायम स्वरूपाची मान्यता नसताना कॉम्पुटर सायन्स या +२ स्तरावरील व्दिलक्षी व्यवसाय अभ्यासक्रमामध्ये विद्यार्थ्यांना अनधिकृतरित्या प्रवेश दिलेले आहेत.

२. सदर संस्थेतील अधिकचे प्रवेशित विद्यार्थी यांनी सत्र २०२४-२५ व २०२५-२६उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण केल्यामुळे त्यांचे प्रवेश आता रद्द करणे शक्य नाही.

३. व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, पुणे यांनी यांनी त्यांच्या दिनांक १०/०३/२०२६ च्या पत्रान्वये संबंधित संस्थेकडून दिनांक १७/०४/२०२५ रोजी प्राप्त झालेल्या पत्रामध्ये नमूद केल्यानुसार संस्थेने शैक्षणिक सत्र २०२४-२५साठी प्रतिवर्षी रु. ३०००/-इतकी फी विद्यार्थ्यांकडून आकारलेली असल्याचे निष्पन्न झाले आहे.

४. प्रतिवादी संस्थेस परिणामांची पूर्व कल्पना असताना देखील संस्थेने विद्यार्थ्यांची दिशाभूल केल्याचे निदर्शनास येत आहे.

५.यावरुन संस्थेने सन २०१३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० मधील प्रकरण २ कलम ३ मधील करण्यात आलेल्या तरतुदींचे उल्लंघन केले आहे. तसेच अधिनियमातील प्रकरण ३ कलम ४ नुसार शास्तीस पात्र आहे.

## आदेश

१) शैक्षणिक सत्र २०२३-२४, २०२४-२५ मध्ये इयत्ता ११ वी साठी अनुक्रमे ३ व २१ विद्यार्थ्यांना कॉम्पुटर सायन्स या अभ्यासक्रमास अनधिकृत प्रवेश दिलेले आहेत,असे अभिलेखावरून स्पष्ट होते.

२) सदर प्रकरण विलंबाने सादर झाले असल्याने सदर संस्थेतील अधिकचे प्रवेशित विद्यार्थी यांनी उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण केल्यामुळे त्यांचे प्रवेश रद्द करणे आजमितीस शक्य नाही.

३) श्री. भास्कराचार्य प्रतिष्ठाण, छत्रपती संभाजीनगर संचालित श्री हनुमंतराव चाटे ज्यु. कॉलेज संभाजीनगर,कोल्हापुर जि. कोल्हापुर.या संस्थेला रू.५,००,०००/-(रू.पाच लाख फक्त ) एवढी शास्ती लादण्यांत येत आहे).

४) संस्था भविष्यात अभ्यासक्रमास मान्यता नसतांना अशा प्रकारचे कोणतेही अनधिकृत प्रवेश करणार नाही,याबाबत संस्थेने जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, कोल्हापूर यांना हमीपत्र सादर करावे

५) महाराष्ट्र राज्यात कृषी, पशु व मत्स्य विज्ञान,आरोग्य विज्ञान, उच्च, तंत्र व व्यवसाय शिक्षण यांमधील अनधिकृत संस्था स्थापन करणे व अनधिकृत अभ्यासक्रम सुरू करणे (प्रतिबंध) अधिनियम, २०१३ व महाराष्ट्र कृषी, पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च, तंत्र व व्यवसाय शिक्षण यांमधील अनधिकृत संस्था व अनधिकृत अभ्यासक्रम (तक्रारी, अपील व सुधारात्मक उपाययोजना) नियम, २०२४ नुसार अनधिकृत प्रवेशाबाबत ठोठावण्यात आलेलाशास्तीचा भरणा खालील लेखाशिर्षामध्ये करुन भरणा केलेल्या चलनाची साक्षांकित प्रत जिल्हा व्यवसाय शिक्षण वप्रशिक्षण अधिकारी, कोल्हापूर यांचे मार्फत तात्काळ संचालनालयास सादर करावी.

विभाग- ०२०२ शिक्षण क्रिडा, कला व संस्कृती
प्रधान शिर्ष:-०१, सर्वसाधारण शिक्षण
उपप्रधान शिर्ष:- (०१) (०८) संकीर्ण
संगणक साकेंतांक: -०२०२ ००८२

६) या आदेशाच्या दिनांकापासून दोन आठवडयाच्या आत शास्तीचा भरणा करणे आवश्यक राहील.

७) प्रस्तुत निर्णयाची माहिती सर्व संबंधितांना कळविण्यात यावी.

या सुनावणी आदेशाबाबत संस्थेस अपील करावयाचे असल्यास अधिनियमातील कलम ७ अन्वये नियुक्त अपिलिय अधिकारी, सहसचिव, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, मादाम कामा रोड, मंत्रालय, मुंबई ४०००३२ यांचेकडे आदेशाच्या दिनांकापासून १५ दिवसांत अपिल करता येईल.

(सतिश सुर्यवंशी)
( संचालक )

स्थळ - मुंबई
दिनांक - 16/07/2026

प्रत: माहिती व पुढील कार्यवाहीसाठी सविनय सादर.

१. मा.सहसचिव, कौशल्य विकास,रोजगार व उद्योजकता विभाग, हुतात्मा राजगुरु चौक,मादाम कामा रोड, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
२. सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, पुणे
३. जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण कार्यालय, कोल्हापूर यांना कळविण्यात येते कि,सदर संस्थेने उक्त शास्तीची रक्कम भरल्याशिवाय सदर संस्थेबाबत पुढील कोणतीही कार्यवाही करण्यात येवू नये.तसेच सदर शास्तीच्या रक्कमेच्या चलनाची प्रत संचालनालयास सादर करण्यांत यावी.
४. श्री हनुमंतराव चाटे ज्यु. कॉलेज संभाजीनगर, कोल्हापुर जि. कोल्हापुर, (जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण कार्यालय, कोल्हापुर यांचे मार्फत)
५. निवडनस्ती (का.क्र.०५